# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 13/01/2020 (सोमवार)
# (सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 20 कि. मी अंतरावर मौजा इंदापुर, ता. भिवापुर येथे दिनांक 11/01/2020 चे 19:00 वा. ते दिनांक 12/01/2020 चे 07:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– एकनाथ मनोहर भुडे, वय 25 वर्ष, रा. इंदापुर, ता. भिवापुर व त्यांचे काका नामे– माधव विठोबा भुडे, वय 45 वर्ष, रा. इंदापुर या दोघांचे शेतात पिकाचे सरंक्षण करिता लागलेल्या दोन सौर उर्जा मशिन व दोन बॅटरी कि. 20,000/– रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस पोलिस हवालदार हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक 11/01/2020 चे 13:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांच्या 14 वर्षीय पीडित/फिर्यादी मुलीला हि शेतात शेंगा तोडत असतांना आरोपी नामे– बुलचंद फत्तु चव्हाण, वय 31 वर्ष, रा. खापा तांडा, ता. काटोल, जि. नागपूर तीला शारीरिक सुखाची मागणी केली. यानंतर पीडितेने आरडा ओरड केली असता आरोपीने तिच्या सोबत बळजबरीने लैंगिक अत्याचार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 ब, 376(3) 376 (2)(जे) भादंवि. सहकलम 4, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक सोनाली जगताप 8421041099 या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 6 कि.मी. अंतरावरील मौजा हरदोली शिवार येथे दिनांक 12/01/2020 चे 13:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजकुमार केळाजी वानखेडे, वय 36 वर्ष, रा. राव लेआउट वडधामणा सुकळी यांची पत्नी नामे– संगिता राजकुमार वानखेडे, वय 33 वर्ष, रा. राव लेआउट वडधामणा सुकळी या एमएच–40/बीआर– 9736 क्रमांकाच्या ॲक्टीव्हा मोपेडने कोंढाळी वरून नागपूर कडे जात होत्या. दरम्यान एमएच–31/एफएच–0976 क्रमांकाचा कारच्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादींच्या पत्नीचे ॲक्टीवहा गाडीला धडक दिली. या अपघातात संगिता वानखेडे यांच्या डोक्यावर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. श्याम गव्हाणे 9923756383 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर